# महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीबीई-२०१४/प्र.क्र.५८ /एसएम-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३२,
दिनांक:- ०३ मार्च, २०१५

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
ज्ञानदीप शिक्षण संस्था,
कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे.

विषय:- सी.बी.एस.ई मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होणाऱ्या कायम विना अनुदानित तत्वावरील इंग्रजी माध्यमाच्या शाळेस मान्यता देणेबाबत. ज्ञानदीप शिक्षण संस्था, पुणे संचलित हेरिटेज इंटरनॅशनल स्कूल, कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. नाहप्र-२००९/६६३/०९/माशि-१, दि. २० जून, २०१२
२) शासन पत्र क्र. हेतुप-२०१२/(८७/१२)/माशि-५, दि. ३० ऑक्टोबर, २०१२
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. माध्य-३/१३/नाहप्र/पुवि/२०१४/२३८६, दि.३० जानेवारी, २०१४

उपरोक्त प्रकरणी संदर्भाधीन क्र.(३) येथील पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या कासार आंबोली, ता. मुळशी, जि. पुणे या ठिकाणी सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतची कायम विनाअनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. नाहप्र-२००९/६६३/०९/माशि-१, दि. २० जून, २०१२ नुसार राज्यात सी.बी.एस.ई/आय.सी.एस.ई /आय.जी.सी.एस.ई./सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या कायम विनाअनुदानित तत्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरिता राज्यशासनाकडे अर्ज केल्यानंतर सदर शाळांना हेतुपत्र (Letter of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व नाहरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपद्धतीची पूर्तता करणे बंधनकारक राहणार आहे.

३) सदर शाळेस, शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती), नियमावली, १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

४) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही

HERITAGE INTERNATIONAL SCHOOL
CBSE
1130762

५) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६) संस्थेने सदर शाळेला शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

७) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रीडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

८) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापकपदी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. ३ (१) (अ) नुसार पात्र व्यक्तींची नियुक्ती करावी.

९) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

१०) संस्थेने सदर शाळेत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करताना बिंदुनामावलीनुसार नियुक्त्या कराव्यात.

११) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१२) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रीडा साहित्य, कार्यानुभव साहित्य, व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१३) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

१४) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१५) मुली-मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय असावी.

१६) शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबविले आहे, असे निदर्शनास आल्यास, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११, मधील नियम १२ नुसार शाळेची मान्यता काढून घेण्यात येईल.

१७) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्यांच्या आत परवानगी दिलेले ठिकाणी शाळा सुरु करेल.

१८) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे, त्या ठिकाणी १८ महिन्यांच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१९) शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११, मधील नियम ११ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतर जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून शाळेला मान्यता घेणे आवश्यक राहील.

२०) जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी शाळेस मान्यता दिल्यानंतर संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी नाहरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करेल.

(रा.ग.गुंजाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

HERITAGE INTERNATIONAL SCHOOL CBSE 1130762